Historicity Research Journal
ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 9 | May– 2017

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

**प्रा. दिवटे दीपिका काशिनाथ**
इतिहास विभाग, सी. बी. खेडगीज महाविद्यालय, अक्कलकोट, जि. सोलापूर.



**प्रस्तावना -**

ज्ञानाचा दिवा घरोघरी लावणाऱ्या एकोणिसाव्या शतकातील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले हे युगप्रवर्तक दांपत्य महाराष्ट्रातीलच नाही तर भारतातील एक वैचारिक आश्चर्य आहे. स्त्रीचे कार्यक्षेत्र केवळ चुल आणि मुल असताना त्याला डावलून घरचा उंबरठा ओलांडून ज्योतिबांनी सावित्रीबाईंना शिक्षण दिले. आत्मप्रेरणा जागृत केली. सावित्रीबाईंनी शिक्षण घेऊन अनेक स्त्रिया, मुली, शुद्रातिशुद्रांना शिक्षित केले व त्यांची उन्नती घडवून आणली. धर्ममार्तंडांनी केलेला अनन्वित छळ सोसून ज्ञानाचा दिवा घरोघरी लावला. महिला मंडळे स्थापन करून महिलांमध्ये कार्यप्रेरक आत्मविश्वास जागृत केले. अशा देवीच्या रुपामध्ये आवश्यक तेथे ते मनुष्याचे रूप साकार करून सावित्रीबाईंनी अनेक कुटूंबे उद्ध्वस्त होण्यापासून वाचविली. एवढेच नाही तर त्यांच्या संसाराचा गाडा योग्य वळणावर आणून विकासप्रत पोहोचविला. आत्मविश्वासाच्या वाटेवर वाटचार करण्यासाठी सिध्द केले. या सर्वांचे श्रेय सावित्रीबाईनांच जाते.

**जन्म व बालपण :**

सावित्रीबाईचा जन्म दि. ०३/०१/१८३१ मध्ये सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात 'नायगाव' या ठिकाणी झाला. आईचे नांव लक्ष्मीबाई तर गावचे पाटील असणाऱ्या वडिलांचे नांव खंडोजी नेवसे पाटील.

स्त्री स्वातंत्र्य औषधालाही नसलेल्या समाजात व काळात सावित्रीबाईंचा जन्म झाला. इ. स. १८४० मध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांच्याशी सावित्रीबाईंचा विवाह झाला. लग्नाच्या वेळी सावित्रीबाईंचे वय नऊ तर ज्योतिरावांचे वय तेरा वर्षाचे होते. ज्योतिबा - सावित्री यांचा विवाह म्हणजे कर्तव्यदक्ष, समाजभिमुख आत्यंतिक जिव्हाळा असणाऱ्या प्रखर तेजस्वी अशा दोन ज्योतींचा संयोग होता. महाराष्ट्रातील परिवर्तनाची ती नांदी होती. परिवर्तनाच्या चळवळीचा तो सुर्योदय होता.

**सावित्रीबाई फुले यांचे कार्य :**

**शैक्षणिक कार्य :-**

सावित्रीबाईंनी स्वतःपासून शिक्षणाचा श्रीगणेशा केला. आपल्या पतीकडून म्हणजेच ज्योतिबांकडून लिहणं, वाचणं शिकून घेतलं. शिक्षणाचे महत्त्व पटले, अक्षरांची ओळख पटली. शब्दांमधला अर्थ गवसला. "मी शिकले, आता मी माझ्या इतर भगिनींना शिकवणार त्यांच अज्ञान दूर करणार, काळोखाच्या गुहेतून त्यांची मुक्तता करणार, उघड्या जगात माझ्या भगिनींना मुक्त श्वास घेता आला पाहिजे." या ध्येयाने सावित्रीबाई हाती क्रांतीची मशाल घेऊन उभ्या राहिल्या.

समाजातील अन्यायपिडीत व उपेक्षित घटकांच्या उध्दारासाठी कार्य करण्याचा निर्णय घेतल्यावर महात्मा फुले यांनी सर्वप्रथम स्त्रियांच्या शिक्षणाकडे आपले लक्ष वळविले. एकोणिसाव्या शतकात भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती अतिशय वाईट होती. येथील समाजाने स्त्रियांना मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित ठेवले होते. भारतीय समाजात प्रचलित असलेल्या अनेक अनिष्ठ चालीरिती, रुढी, परंपरा स्त्रियांवर होणारे घोर अन्याय करणाऱ्या होत्या. पारंपारिक भारतीय समाजाने स्त्रियांवर अनेक जाचक बंधने लादली होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व घराच्या चार भिंतीच्या आतच कोमेजून जात होते. स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करावयाची असेल तर त्यांना शिक्षण दिले पाहिजे, हे ज्योतिरावांनी ओळखले म्हणून त्यांनी इ. स. १८४८ मध्ये पुण्याच्या बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. महाराष्ट्रातील ही पहिली मुलींची शाळा होती. ह्या शाळेत सावित्रीबाईंना ज्यातिबांनी शिक्षिका म्हणून नेमले. सावित्रीबाई ह्या पहिल्या भारतीय स्त्री- शिक्षिका व मुख्याध्यापिका म्हणून मानल्या जातात. स्त्री -शिक्षिका म्हणून कार्य करताना सावित्रीबाईंना खूप त्रास झाला. त्यांच्यावर खूप संकटे आली. मुलींना शाळेत पाठविण्याची कल्पनाच त्याकाळी कुणाला पटत नव्हती. उलट ते धर्माच्या विरुध्द आहे असे मानीत. त्यांची टवाळी आणि निंदा करीत पण सावित्रीबाईंनी तिकडे लक्ष न देता, न डगमगता आपले शिक्षण देण्याचे कार्य चालूच ठेवले.

**सामाजिक कार्य :-**

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रात ही काम करणे गरजेचे आहे. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविणे गरजेचे आहे, हे सावित्रीबाईंनी ओळखले. आपल्या प्रतिभेला परिश्रमाची जोड देऊन समाजाचे कल्याण करण्याचा प्रयत्न केला.

**१) महिला सेवा मंडळ :**

भारतीय समाज व्यवस्थेच्या भिंती अतिशय मजबूत आहेत. या भिंतीत स्त्री सर्वात जास्त गुदमरली असून तिला मोकळा श्वास घेता यावा, महिला एकत्रीत यावेत, बोलावेत, त्यांच्या मनातील भावना स्पष्ट करावेत, त्यांना त्यांच्या जाणीवा समजतील, त्यांना प्रेरणा देऊन समाजासाठी काहीतरी साध्य करता येईल या उद्देशाने सावित्रीबाईंनी इ. स. १८५२ मध्ये "महिला सेवा मंडळ"ची स्थापना केली. या मंडळाच्या पहिल्या अध्यक्ष या मिसेस जोन्स होत्या तर सावित्रीबाई सचिव होत्या.

स्त्रियांच्या उन्नतीसाठी झटणारी ही पहिली संस्था होय. हे मंडळ केवळ कार्यक्रम साजरे करणारे मंडळ नसून स्त्री चळवळीला गतिमान करणारे मंडळ होते. या मंडळात विधवा पुर्नविवाह घडवून आणण्यासाठी हळदी, कुंकू, रसपान, प्रौढ स्त्रियांचे शिक्षण, दारुड्या नवऱ्याच्या जाचातून पत्नीला सोडविण्याचा प्रयत्न मंडळ करीत असे.

**२) बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थापना :**

बालविवाह व प्रौढ विवाह पध्दतीमुळे समाजात विधवा स्त्रियांची संख्या बरची असे. त्यांना असहाय्य अवस्थेत जीवन जगावे लागत असे. काही विधवा पुरूषांच्या वासनेच्या बळी ठरत असत. अशा नामुष्कीच्या प्रसंगातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी विधवा स्त्रिया, कुमारिका एकतर मृत्यूला कवटाळत किंवा भ्रुणहत्त्येच्या मार्गाचा आसरा घेत असत. अशा प्रसंगात सापडलेल्या दुर्दैवी स्त्रियांची विटंबना टाळण्यासाठी महात्मा फुलेंनी स्वतःच्या घरीच "बालहत्या प्रतिबंध गृह" ची स्थापना केली. या गृहातील अनाथ मुलांचे संगोपन करण्याचे महान कार्य सावित्रीबाईंनी केले. या अनाथ मुलांना केवळ वाढवलेच नाही तर त्यांच्यावर माणुसकीचे संस्कार घडवले. त्यांना समतेचे सैनिक बनवले. या अनाथ मुलांच्या त्या 'माऊली' होत्या. या गृहात जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मुल इ. स. १८७१ मध्ये दत्तक घेतले तोच पुढे विख्यात डॉक्टर यशवंत ज्योतिराव फुले झाला.

**३) दुष्काळग्रस्तांना मदत :**

सन १८७७ मध्ये महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला होता. माणसांना अन्न नाही, जनावरांना चारा - पाणी नाही. कित्येक लोक आपले गाव सोडून जात होते. दुष्काळाची भयानकता पाहून सावित्रीबाई खिन्न झाल्या होत्या. अशा दुष्काळी स्थितीत सत्यशोधक समाजाकडून मोफत भोजन केंद्र उघडून सावित्रीबाईंनी दोन हजार निराश्रीत मुलं-मुलींच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था केली. दुष्काळ निर्मुलन कार्यासाठी सावित्रीबाई राब-राब राबल्या.

**४) केशवपन व न्हाव्यांचा संप :**

१९ व्या शतकात पती निधनानंतर स्त्रियांना भयानतक स्थितींना समोरे जावे लागत असे. एक तर तिला सती जाणे किंवा केशवपन करावे लागत. पती निधनानंतर स्त्रिला आधी न्हाव्यासमोर बसविले जात असे. तिचे संपूर्ण केस वस्तऱ्याने काढले जात. एका क्षणात ती स्त्री विद्रुप केली जात होती. तिला कोणत्याही धार्मिक कार्यात सहभागी होता येत नसे. ही अमानुष प्रथा कोठे तरी थांबली पाहिजे असे सावित्रीबाई व ज्योतिबा फुले यांना वाटू लागले. त्यासाठी त्यांनी सर्व नाभिकांना संघटीत करून नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन केले व न्हाव्यांचा ऐतिहासिक संप घडवून आणला. हे महान कार्य सावित्रीबाईंच्या प्रेरणेने घडला होता. नाभिकांनी केलेल्या या लोकविलक्षण संपाचा वृतांत 'दि टाईम्स' या वृत्तपत्राने ९ एप्रिल १८९० च्या अंकात प्रसिध्द केले होते. हे वृत्त वाचून इंग्लंडमधील स्त्रियांनी पत्रे पाठवून सावित्रीबाईंचे अभिनंदन केले.

याशिवाय विधवा पुर्नविवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कार्ये सावित्रीबाईंच्या कल्पनेने पार पाडली. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचे मोठा सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतरही (इ. स. १८९०) सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्यांच्या माध्यमातून केला. "काव्यफुले" व "बावनकशी सुबोध रत्नाकर" हे काव्य संग्रह त्यांनी लिहीले.

**५) १८९६ चा दुष्काळ :**

सन १८७७ मध्ये भीषण दुष्काळ पडला होता आणि त्यावेळी सावित्रीबाईंनी अनेक निराधार लोकांना मदत केली होती. इ. स. १८९६ मध्ये पुन्हा दुष्काळ आला. परंतु यावेळी ज्योतिबा हयात नव्हते. यावेळची परिस्थिती भयानक होती. शेतकऱ्यांची अगदी दुर्दशा झाली होती. अन्नाचा कणही खायला मिळत नव्हता. त्यामुळे सावित्रीबाईंचे मन आक्रंदून गेले होते. काय करावे आणि काय करू नये असे त्यांना होऊन गेले होते. परंतु केवळ शोक करीत बसण्याला त्यांना वेळ कोठे होता ? सावित्रीबाईंनी लगेचच आपल्या सत्यशोधक समाजाच्या

कार्यकर्त्यांसोबत दुष्काळग्रस्त भागाची पाहणी केली. कलेक्टरची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या अनुभवी व्यक्तींच्या भेटी घेऊन त्यांचे मार्गदर्शन घेतले. या सर्व प्रयत्नांना यश आले. शासनाने दुष्काळग्रस्त भागात रोजगार कामे सुरू केली. शेतकऱ्यांचा सारा, महसूलीत सुट मिळाली. सावित्रीबाई यांच्या या कार्याला हातभार म्हणून पंडीता रमाबाई, बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी स्वखुषीने अन्न, वस्त्र व आर्थिक मदत पाठविली. ज्या-ज्या लोकांनी मदत केली त्यांची ती मदत सावित्रीबाईंनी सत्कारणी लावत, परिश्रम करीत या भीषण दुष्काळाला समर्थपणे तोंड दिले.

## ६) इ. स. १८९७ मधील प्लेगचा वणवा :

सन १८९६ चा दुष्काळ संपतो न संपतो तोच फेब्रुवारी १८९७ मध्ये प्लेगच्या साथीने हाहा:कार उडवून दिला. पुण्यामध्ये प्लेगने थैमान घातले. हा संसर्गजन्य साथ उंदरामुळे फैलावतो. एका-एका कुटूंबातील अनेक माणसे दगावली जाऊ लागली. प्लेगमुळे माणसे गावेच्या गावे सोडून जाऊ लागली. अशा परिस्थितीत सावित्रीबाई पाहत थोड्याच गप्प बसणार? त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करून या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केला. डॉ. यशवंत हा सावित्रीबाईंचा दत्तकपूत्र होता. त्याने अहमदनगरला दवाखाना काढला होता. सावित्रीबाईंनी त्याला पुण्याला बोलावून घेतले. त्यांनी ससाण्याच्या माळावर दवाखाना उघडला आणि प्लेगच्या रोग्यांवर औषधोपचार सुरू केले. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते आजारी माणसाला उचलून दवाखान्यात आणत होते. त्यांच्यावर डॉ. यशवंत उपचार करीत होते. त्या काळात सावित्रीबाई रानात फिरून सेवा करीत होत्या, धावपळ करीत होत्या. स्वत:च्या शरीराला त्रास होत असतानाही त्या लोकसेवेचे काम करीतच होत्या. स्वत:च्या शरीरास लोकसेवेसाठी चंदनासारखं झिजवत होत्या. रुग्णांमध्ये त्या परमेश्वर पाहत होत्या. मानवसेवा हीच ईश्वरसेवा असे त्या मानीत होत्या.

प्लेगच्या रोग्यांची सेवा करताना सावित्रीबाईंना प्लेगची लागण झाली. काखेत गाठ आली. ताप भरपूर चढला. डॉक्टरांनी फार शिकस्त केली. परंतु त्या तापातच सावित्रीबाईंना काळझोप लागली. सावित्रीबाईंचा प्राण नियतीने आपल्या कवेत घेतला. तो दिवस होता १० मार्च, १८९७. प्लेगच्या रुपाने नियतीने सावित्रीबाईंना गजाआड केले.

**"जो आवडतो सर्वांना, तोचि आवडे देवाला."**

या प्रमाणे देवाने सावित्रीबाईंला देखील या क्रांतीकार्यातून मुक्त केले.

## कार्याचे मूल्यमापन :

समाजाला प्रेरणा देणारी, समाजाचे ऋणानुबंध लक्षात घेऊन कार्य करणारी सामाजिक कार्यकर्ती, स्त्रियांची सावली, गोरगरीबांची माता, नवसमाजाचे स्वप्न पाहणारी व खेळ अर्ध्यातच सोडून नियतीने झडप घालून नेलेली सावित्रीबाई आज सामाजिक व शैक्षणिक कार्याच्या रुपाने अजरामर राहिली.

**"मरावे परी किर्तीरुपे उरावे."**

या प्रमाणे सावित्रीबाई आजही आपल्यात जिवंत आहेत. आजच्या या अशांत आणि असूरक्षिततेच्या काळात सावित्रीबाईच्या कर्तव्य व नेतृत्वाची तेवढीच गरज वाटते जेवढी की त्या वेळी होती. त्यांच्या या सामाजिक कार्यातून कुणालाही प्रेरणा निर्माण व्हावी, असे वाटते. सावित्रीबाई व त्यांच्या कार्यालया कोटी - कोटी प्रणाम !

## संदर्भग्रंथ सूची :


१) डॉ. सौ. किरण नागतोडे - कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले
२) दिव्य मराठी - सावित्रीबाई फुले - सामान्यांचे उर्जाकेंद्र
३) महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास - प्रा. व्ही. बी. पाटील
४) इतिहास घडविणाऱ्या सामर्थ्यवान महिला - चंद्रशेखर गायकवाड
५) सावित्रीबाई फुले - मराठी मनाच्या विविध पैलुंचा वेध घेणारे एक खुले व्यासपीठ (महाजाल वरून)